शिक्षा अंतिम करणेचा पारीत केलेला आदेश रदद करणे बाबत.
(श्री.संदिप बाबूराव बळीद तत्कालीन ग्रामसेवक, ग्रामपंचायत- खांडके ता.नगर हल्ली कार्यरत पं.स.पारनेर)

जिल्हा परिषद अहमदनगर
सामान्य प्रशासन विभाग-२
जिल्हा परिषद आदेश क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/९८० /२०२४
अहमदनगर, दिनांक-१५/०४/२०२४

संदर्भ :- १. या कार्यालयाकडील दोषारोपपत्र / ज्ञापन क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/८८९/२०१८, दिनांक- २३/०८/२०१८
२. गट विकास अधिकारी, पंचायत समिती नगर यांचेकडील पत्र क्र. आस्था-२/८५४/२०१८, दिनांक- ०६/०९/२०१८
३. गट विकास अधिकारी, पंचायत समिती नगर यांचेकडील पत्र क्र. आस्था-२/२२०/२०१९, दिनांक- ०६/०३/२०१९
४. श्री.वळीद यांचा खुलासा दिनांक- ०१/०३/२०१९
५. या कार्यालयाकडील चौकशी अधिकारी नेमणूक आदेश क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/७४२/२०१९, दिनांक- ०९/०८/२०१९
६. सहाय्यक आयुक्त (चौकशी), नाशिक विभाग, नाशिक यांचेकडील चौकशी अहवाल क्र. विशा.४/खाचौ/सी.आर.१३९/२०१९, दिनांक- ०५/१०/२०२१
७. या कार्यालयाकडील पत्र क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/५८/२०२२, दिनांक- १८/०१/२०२२
८. गट विकास अधिकारी, पंचायत समिती नगर यांचेकडील पत्र क्र. वशि/आस्था-२/२८६/२०२२, दिनांक- ०५/०४/२०२२
९. याकार्यालयाकडील अंतिम कारणे दाखवा नोटीस क्रं.साप्रवि-२/१६-२०१९/ ६६३/२०२२ दि.३.०८.२०२२
१०. श्री.बळीद यांचा खुलासा दिनांक- ०९/१०/२०२२
११. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ४ ( २ )
१२. आदेश क्र.साप्रवि-२/ग्रांप-३/७८७/२०२२ दिनांक १२/१२/२०२२ (शिक्षा अंतिम करणे )
१३.मा.अपर आयुक्त नशिक विभाग नाशिक यांचे कडील अपील क्रमांक १९/२०२३ चे निकालपत्र दिनांक १५/०१/२०२४

ज्या अर्थी संदर्भ क्रमांक ०६ अन्वये प्राप्त मा.सहाय्यक चौकशी अधिकारी नाशिक विभाग नाशिक यांचे कडील चौकशी अहवालातील निष्कर्ष, गट विकास अधिकारी, पंचायत समिती नगर यांचे अभिप्राय व श्री.बळीद, ग्रामसेवक, यांनी सादर केलेला खुलासा यांचा विचार करुन श्री.बळीद संदीप बाबुपराव तत्कालीन ग्रामसेवक ग्रामपंचायत खांडके तालुका नगर यांनी कामात गैरवर्तन व गैरव्यवहार केलेले असल्याने, तसेच त्यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ मधील नियम ३ चा भंग केल्याने त्यांनामहाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील ४ ( २ ) नुसार, पुढील वेतनवाढ भावी काळातील वेतन वाढीवर कायम परिणाम होईल अशा रितीने एक वर्षाकरीता थोपविण्याची शिक्षेचा आदेश संदर्भ कमांक १३ अन्वये नियुक्ती प्राधिकारी यांनी पारित केलेला आहे. त्या आदेशा विरुध्द श्री. संदिप बाबुराव बळीद, तत्कालीन ग्रामसेवक, ग्रामपंचायत- खांडके ता.नगर यांनी मा.अपर आयुक्त नशिक विभाग नाशिक यांचे कडे अपील क्रमांक १९/२०२३ दाखल केलेले होते.मा.अपर आयुक्त ,नाशिक विभाग नाशिक यांनी दिनांक १५/०१/२०२४ रोजी देण्यात आलेले आहे.

१.अपिलार्थी यांचे अपील मान्य करण्यात येत आहे.
२.मुख्य कार्यकारी अधिकारी ,जिल्हा परिषद ,अहमदनगर यांनी अपीलार्थी विरुध्द पारित केलेला शास्ती आदेश जा.क्र./साप्रवि-२/ग्रांप-३/७८७/२०२२ दिनांक १२/१२/२०२२ रदद करण्यात येत आहे.
३.खर्चाबाबत आदेश नाहीत.

Scanned with OKEN Scanner

४.सदर निर्णय सं संबधिताना स्वतंत्ररित्या कळविण्यात यावा.
५.सचिका बंद करण्यात येऊन अभिलेख कक्षात पाठविण्यात यावी.

सबब मा.अपर आयुक्त नाशिक विभाग नाशिक यांनी दिलेल्या निकालपत्र आदेशा प्रमाणे जिल्हा परिषद अहमदनगर शिस्त विषयक प्राधिकरण यांनी संदर्भ क्रमांक १२ अन्वये दिलेला शास्ती आदेश जा.क्र./साप्रवि-२/ग्रांप-३/७८७/२०२२ दिनांक १२/१२/२०२२ या आदेशान्वये रदद करण्यात येत असुन सदर आदेशाची नोंद अपीलार्थी श्री.संदीप बाबुराव बळीद, ग्रामसेवक यांचे सेवा पुस्तकात घेण्यात येऊन पुढील नियमोचित कार्यवाही संबधीत खाते प्रमुख यांनी करावी.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक 202404150600068 असा आहे.

(आशिष येरेकर, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर

प्रति,

श्री.संदीप बाबुराव बळीद, अपीलार्थी तत्कालीन ग्रामसेवक,ग्रामपंचात खांडके हल्ली कार्यरत पं.स.पारनेर
व्दारा :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती पारनेर
प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती पारनेर

२/- सदरचे आदेश संबंधितांस बजावून बजावलेबाबतची तारखेसह स्वाक्षरीची प्रत व मुळ सेवा पुस्तकात घेतलेल्या नोंदीची प्रत या कार्यालयास तात्काळ सादर करणेत यावी.

प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती नगर

(आशिष येरेकर, भाप्रसे.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर

Scanned with OKEN Scanner